# कै. रसिका महाविद्यालय, देवणी

## राष्ट्रीय सेवा योजना

"पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धन व स्वच्छ भारत अभियानासाठी युवक-युवती शिबिर"

शिबिर कालावधी (15/03/2022 ते 21/03/2022)

## शिबिर अहवाल

1) पहिला दिवस

दिनांक 15/03/2022 रोजी शिबीर स्थळ मौजे शिवाजीनगर कडे दुपारी 02:30 वाजता महाविद्यालयातून प्रस्थान. दुपारी 02:30 वाजता शिबीर स्थळी आगमन. निवास स्थळाची स्वच्छता करून निवासाची व्यवस्था करण्यात आली यानंतर दुपारी 03:00 वाजता सर्व स्वयंसेवकांचे सोबत शिबिर कालावधीत करावयाच्या कामाचे नियोजन करण्यात आले या नियोजनात दैनंदिन कामाचे नियोजन, कार्यक्रमाचे उद्घाटन, गावात शोषखड्डे तयार करणे, ग्राम स्वच्छता करणे, विविध विषयावर व्याख्यान आयोजित करणे. सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, गावाचे सर्वेक्षण करून अहवाल बनवणे, शिबिराचा समारोप करणे; या कामाच्या बाबतीत स्वयंसेवक व स्वयंसेविका सोबत चर्चा करण्यात आली व मार्गदर्शन करण्यात आले.

2) दुसरा दिवस

दिनांक 16/03/2022 रोजी प्रात:विधी नंतर योगासने व प्राणायाम करण्यात आले त्यानंतर अल्पोपहार व नंतर गावातील नागरिकांची ओळख व समस्या जाणण्यासाठी स्वयंसेवक व स्वयंसेवीके द्वारा गावात पत्रिकेचे वाटप करण्यात आले. तसेच कार्यक्रम उद्घाटन स्थळावर बॅनर लावणे, परिसराची स्वच्छता करणे व साहित्याची जमवाजमव करणे ही कार्ये करण्यात आले. दुपारी 03:00 ते 04:00 च्या सुमारास *"वाचन का आवश्यक आहे"* याविषयी उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी सखोल मार्गदर्शन केले; तर संध्याकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी रात्रीच्या जेवणानंतर गटचर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur

3) **तिसरा दिवस**

दिनांक 17/03/2022 या रोजी शिबिराच्या उद्‌घाटन समारोह कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शिबिराचे उद्‌घाटन माननीय श्री गजाननजी भोपनीकर साहेबांनी केले तर या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शिवाजीनगर चे सरपंच श्री ज्ञानेश्वर शेंडगे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नारायण भोसले (केंद्रीय विद्यापीठ अमरकंटक, मध्य प्रदेश) हे उपस्थित होते. याच सोबत कमलाकर बालूरे, राहुल बालूरे, चंद्रकांत गरड (मुख्याध्यापक) व गावातील अनेक नागरीक, महाविद्यालयातील प्राध्यापक, स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी श्रमदानातून गावाचा विकास कामाची सुरुवात करण्याचे व ग्रामस्वच्छतेचे आवाहन प्रमुख व्याख्यात्यांनी केले यावेळी माजी कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रशांत भांडे यांनी यांनी NSS गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. दुपारी जेवणानंतर 04:00 वाजता उद्‌घाटन समारोह कार्यक्रमाची सांगता झाली.

4) **चौथा दिवस**

दिनांक 18/03/2022 रोजी दैनंदिन प्रातःविधी आटोपून योगासने व प्राणायाम करण्यात आले. यानंतर अल्पोपहार झाल्यानंतर शाळेच्या परिसराची स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. यासोबत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांशी स्वयंसेवकांनी संवाद साधला. दुपारच्या सत्रात स्वयंसेवकांनी गावातील घरांचे सर्वेक्षण केले व यात काही माहिती गोळा केली. दुपारच्या सत्रात *"भारतीय संविधान"* या विषयावर डॉ. पी आर मोरे यांनी मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन स्वयंसेवकाने केले.

5) **पाचवा दिवस**

दिनांक 19/03/2022 रोजी दैनंदिन प्रातःविधी आटोपल्यानंतर योगासने व प्राणायाम व अल्पोपहार केल्यानंतर स्वयंसेवकांनी शाळेच्या परिसराची स्वच्छता केली. यानंतर स्वयंसेवक व स्वयंसेवकांनी सर्वेक्षण व माहिती गोळा करण्यासाठी चालू केली यामध्ये गावातील लोकांशी संपर्क साधणे व

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur

माहिती विचारून लिहिण्यात आली. दुपारच्या भोजनानंतर *"व्यक्तिमत्व विकास"* या विषयावर मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रशांत भंडे यांनी मार्गदर्शन केले.

6) **सहावा दिवस**

दिनांक 20/03/2022 रोजी दैनंदिन प्रातःविधी आटोपून योगासने व प्राणायाम अल्पोपहार यानंतर स्वयंसेवकांनी सर्वेक्षण माहिती जमा केली तसेच मंदिर परिसराची साफसफाई प्राध्यापक तथा स्वयंसेवकांनी केली तसेच समारोप कार्यक्रमाची पूर्वतयारी केली दुपारच्या सत्रात रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजय मोरे यांनी *"सौर ऊर्जा - काळाची गरज"* या विषयावर मार्गदर्शन केले.

7) **सातवा दिवस**

दिनांक 21/03/2022 रोजी दैनंदिन प्रातःविधी आटोपून योगासने व प्राणायाम अल्पोपहारानंतर शिबिर समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून देवणीच्या नूतन नगराध्यक्षा डॉ. किर्ती घोरपडे या उपस्थित होत्या तर ग्राम स्वच्छते वर विशेष व्याख्याने देण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक लक्ष्मणराव दारनुळे हे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. यावेळी लक्ष्मणराव दारनुळे यांनी *"ग्रामस्वच्छता व चांगले आचरण"* याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी स्वयंसेवकांचा सत्कार करून सर्वांचे भोजन संपन्न झाले व दुपारी 04:00 वाजता शिबिराचे निवासस्थानापासून महाविद्यालयाकडे प्रस्थान करण्यात आले.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur